3008

इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ धुळें.

—: हस्त लिखित ग्रंथ संग्रह :—

ग्रंथ क्रमांक ५३५१ वे १३१ [३१५]

ग्रंथ नाम महावाक्य विवेक.

विषय म. वेदांत.

" Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. "

क्रं.ग-९९
१०

मराठी गद्य

महावाक्य विवेक

कऱ्हाड- [illegible]

४३४ पं: ९४

" Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. "

श्रीमद्गुरुचरणः शरणं॥ महावाक्यविवेकप्रारंभः॥ येनेक्षते शृणोती
दं जिघ्रति व्याकरोति च॥ स्वाद्वस्वादू विजानाति तत्प्रज्ञानमुदीरि
तं॥१॥ साधनचतुष्टयसंपन्न कोणीयेक उत्कृष्ट सात्वीक निष्काम पुण्य
(1) वान् पुरुष जो तो सर्वदा सकल व्यवहारी आत्मज्ञाना[illegible]चा मननानु
रूप विचार असा करीत असतो। तो कोण्या प्रकारचा। विरक्त अधि
कारी या निविश्वासपूर्वक श्रवण मनन निदिध्यासन केले असतां
शरीर असतां च अपरोक्ष साक्षात्कारवान् ब्रह्मस्वरूप जीवन्मु
क्त होतो। तो महावाक्यजन्य अद्वैत विचार श्रवण करा॥ येन ई
क्षते। जेणे करून जा आत्मज्ञाने करून ब्रह्मादि पिपीलिकांत
सकळ प्राणी सकळ पदार्थांचें अवलोकन करतात्। येन श्
न णोति। जा आत्मज्ञाने करूं सकळ प्राणी सात्वीक राजेस ता
मस शब्द श्रवण करतात्। येन इदं जिघ्रति। जा आ



Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

त्य घ्राने करून हे सुगंधादीक वस्तुचे आघ्राण सर्वास कळते।
(1A) येन घ्या करोतिच। जेणे करून शिव विष्णु ब्रह्मादि पिपीलि
कांत व्योक रोति। जेणें सकाम कर्म केलें त्यासे नाशवंत स्वर्गा
ल दिविषयजालरूप मायीक पदें द्यावें। निष्काम कर्मानुष्ठानां
त जो प्राणी त्याचें नाशरहीत अक्षयी स्वरूपभूत ब्रह्माकार अंतः
करण करावें। दुष्टाचा निग्रह करतो। साधूचें रक्षण करतो असे
शब्द वेदशास्त्ररूप सकळ व्यापार ज्या आत्मज्ञानें करून करतात।
येन स्वादुअ स्वादु विजानाति। अणखी जेणें करून जाणतो
याचें कर्म उत्तम याचें कर्म निषिध तसेंच हा पदार्थ गोड हा
कडु हा तिखट हा खारट हा अळणी हा मळमळीत हा तुरट
हा योग्य हा अयोग्य असें सकळ शरीरी सर्व पदार्थ मात्राचि
रुचि जेणें करून जाणतात। तत्प्रशानं उदीरितं। तें प्रक
र्षे करून सर्व वेदशास्त्र सिद्ध उपनिषदि लिहलयाचें का

रणाअवरूपा॥ अथा चें प्रकाशक जें निर्विशेष नित्य शुद्ध बुद्ध मुक्त एक
तें प्रज्ञान शब्दें करून बोलिजेलें ॥१॥ अणखि बहूतत्वज्ञाचें स्वरू
प बोधक आहे तूं। अनेन येन वा पश्यतीत्यादेः सर्वाण्येवैतानि श्रुति
प्रज्ञानस्य नामधेयानि नित्यं न स्याद् अंतर वाक्य संदर्भस्य। अयमेव
अर्थः॥ प्रज्ञान शब्दार्थाते बोलून अन्य शब्दार्थ बोलता तूं। चतु
(२) र्मुखेंद्र देवेषु मनुष्याश्वगवादिषु। चैतन्यमेकं ब्रह्मातः प्रज्ञा
नं ब्रह्म मय्यपि ॥२॥ चतुर्मुखेंद्रादि। ब्रह्मादि पिपीलिकांतप्रा
णिमात्राचा ठायीं चैतन्य एक चैतन्य एक जे तें आहे। अतः। या
स्तव ब्रह्म व्यापकत्वात् तें च आत्मज्ञान व्यापक आहे आकाशा
सही व्यापून आहे जें निर्गुण नाम रूप रहीत पूर्ण तें ब्रह्म। म
य्यपि प्रज्ञानं। मो ज्ञाहीं गोयीस कल व्यवहारास कारण तेंच
प्रज्ञान म्हणजें प्रकर्षें करून ज्ञानमात्र सत्य आहे वरकड मी
माजें असें जे दिसतें ते मृगजळवत् व्यापक ज्ञानातच काल्पी

Joint Project of the Rajawade Samshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

(2A)

तआहे ह्मणून जें सत्यव्यापक तें च अज्ञान कल्पनें करूनजी
वदशेस अलें सें दिसतें परंतु वारूनवी क अज्ञानचनाहि मग
जीवदशा कोठून असेल तात्पूर्य कायआहे। जीवनोचब्रह्म। ह्म
णून ऋग्वेदनिष्ठमहावाक्यानें उपदेश केला आहे। तें महावा
क्य। ॐ प्रज्ञानं ब्रह्म। याप्रकारें प्रज्ञान अणाखि ब्रह्म एकचआहे
असें जाणावें।।१।। ऋग्वेदाचें ऐतरेय।। उपनिषधांनिष्ठ महा
वाक्य सांगून अनंतर यजुर्वेदाचे बृहदारण्य उपनिषदनि
ष्ठ महावाक्य अणाखि त्याचें लक्षार्थ रूप सांगतो।। ॐ अहं ब्र
ह्मास्मि।।२।। परिपूर्णः परमात्मास्मिन्देहे विद्याधिकारिणि।। बु
द्धेः साक्षितया स्थित्वा स्फुरन्न हमितीर्यते।।३।। परिपूर्णजो प
रमात्मा। अस्मिन्विद्याधिकारिणि देहे। हाजो ब्रह्मविद्येस अ
धिकारीदेह त्या देहाचा ठायीं श्रवणादिकें करून संस्कृतजी बु

"Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai."

षित्या बुधीचा साक्षित्वे करून। स्थित्वा राहून स्फुरनूत्र काशमा
न होत्साता अहं इति ईर्यते। अहं पदे करून लक्ष्यांशे करून बोलि
जेतो॥ स्वतः पूर्णः परात्मात्र ब्रह्मशब्देन वर्णितः॥ अस्मीत्यैक्य
(3) परामर्शस्तेन ब्रह्मास्मि वाक्य हं॥४॥ स्वतः पूर्णः। परमात्मा। स्वभा
वें करून देशकालवस्तु करून जो अनवछिन्न परिपूर्ण परमात्मा।
अत्र। ह्या महावाक्याचाठायीं ब्रह्मशब्दें करून बोलिजेला। अस्मि
य या पदें करून उभय पदांचें लक्ष्यांशे करून ऐक्य बोलिजेलें। तेनअहं
ब्रह्मास्मि वाक्य। ह्या कारणास्तव मी ब्रह्म कालत्रयीं होतो म्हणजे आ
तां न वें होयाचें नाही सिद्धच सर्वदा आहें असें अभेदें करून जा
णावें॥४॥ आतां छांदोग्यउपनिषदांतील जें महावाक्य वाक्यार्थी लि
हिलो। ॐ तत्त्वमसि॥ एकमेवाद्वितीयं सन्नामरूपविवर्जितं। सृ
ष्टेः पुराधुनाप्यस्य ताद्दृक्त्वं तदितीर्यते॥५॥ एकमेवेति। एकचेअ

Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai Joint project of the

(3A)

द्वितीयं सत्तें नामरूपरहितं । स्रष्टीहून पूर्वीं आतां पुढें हि असें जें त
त्त्वं ह्मणजे विचार दृष्ट्या तेंच तें एतादृशा स्वरूप लक्षदें करून
व बोलिजेलें ॥५॥ श्रोतुर्देहेंद्रियातीतं स्वच्छ त्त्वंपदेरितं ॥ एकताम्प्रा
प्य तेसीतितदैक्यमनुभूयतां ॥६॥ श्रोतुः । महावाक्यश्रवणास
अधिकारी जो पुरुष त्याचें जे देहत्रयादि त्याहून अतीत ह्मणजे
भिन्न असे जें वस्तु तें । अत्र । या महावाक्याचा ठायीं त्वंपदें करून
ईरितं बोलिजेलें । असें या पदें करून उभयूत त्वंपदाचें एकत्वग्र
हण केलें । तनू । ऐक्यं । अनुभूयतां । तें ऐक्य जें तें सर्वदा अनुभवावें ॥६॥
स्वप्रकाशापरोक्षत्त्वमयमित्युक्तितो मतं ॥ अहंकारादिदेहांतात्प्र
त्यगात्मेति गीयते ॥७॥ अयं । इत्युक्तितः । अयं ह्मणजे हा अंतः
करणादि दृश्य साक्षित्त्वें करून बोलिजेला जो तो स्वप्रकाश सर्वांचा
प्रकाशक अपरोक्ष ह्मणजे प्रत्यक्ष स्वर्गाचे परी परोक्ष न व्हे घ
यादिकाचे परी दृश्य न व्हे त्तिरही तम न जाले ह्मणजे अविष

Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai

(4)

त्वेंकरूनप्रत्यक्षज्ञानस्वरूपआत्मामीआहेअसेंमलंनामसकलवे
दशास्त्रेंकरूनविद्वज्जनअनुभवेंकरूनसंमतआहे।अहंकारा
दिदेहांतालूप्रत्यक्।आत्मा।इतिगीयते।अहंकारापासूनदेहत्र
यरूपविराट्हिरण्यगर्भईश्वरउत्पत्तिस्थितिप्रलयविश्वतैजस
प्राज्ञजाग्रतिस्वप्नसुषुप्तिएतादृशागुणत्रयानिर्मीतजेअनेकस्व
भावत्याहूनप्रत्यक्तत्साक्षिचेंभिन्नयाप्रकारेंबोलिजेतआहे॥
७॥दृश्यमानस्यसर्वस्यजगतस्तत्त्वमीर्यते॥ब्रह्मशब्देनतद्ब्र
ह्मस्वप्रकाशात्मरूपकं॥८॥मायाअविद्यारूपआकाशादीक
परिदृश्यमाननामरूपात्मकअसेंजेंसंपूर्णजगत्याचेंतत्त्वअ
धिष्ठानसच्चिदानंदरूपब्रह्मशब्देंकरूनबोलिजेतेंजें।तद्ब्र
ह्म।तेंब्रह्मस्वप्रकाशआत्मरूपलक्षांशेंकरूनजीवब्रह्म
ऐक्यरूपतें[illegible]च होय॥८॥इतिअथर्वणवेदगतस्यमहावाक्यं॥

Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan Mumbai

ॐ अयमात्मा ब्रह्म ॥ याप्रकारें चंहु वेदांचि चार महावाक्यें त्या
चा अखंडार्थ यथोक्त जाणून संप्रदायपूर्वक त्याचें श्रवण मन
न निदिध्यासन जें सर्वात्मभावें करून विश्वासपूर्वक सर्वदा
(4A) अकर्त्र अभोक्तृ बुधीनें जे करिताहेत ॥ तेंच कृतकृत्य आनंद
रूप होत्साते जन्मासंसारें रहित जाहेत ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥
इति महावाक्यविवेक समाप्तः ॥ तत्सद्ब्रह्मार्पणमस्तु ॥ छ ॥
कुलं पवित्रं जननी कृतार्था वसुंधरा पुण्यवती च तेन ॥ अनं
तसंवित्सुखसागरेस्मिन् लीनं परब्रह्मणि यस्य चेतः ॥ १ ॥

" Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. "

## मूळ प्रत पाहण्यासाठी संपर्क

---


**इतिहासाचार्य वि.का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे**
राजवाडे पथ, गल्ली नं. १, धुळे-४२४००१ (महाराष्ट्र)
**दूरध्वनी क्रमांक** (०२५६२) २३३८४८
**Email ID** : rajwademandaldhule@gmail.com